अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com ▪ गुरुवार, दि.१५ फेब्रुवारी २०२४ ▪ ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १३७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## प्रवाशास मारहाण करून पैसे लुटले

**सोलापूर :** प्रवाशास मारहाण करून रोख रक्कम आणि मोबाईल लुटल्याची घटना पंढरपूर येथील रेल्वे स्थानकाजवळ सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली या प्रकरणात पंढरपूर शहरच्या पोलिसांनी रिक्षा चालकासह दोघांना अटक करून पोलीस कोठडी घेतली आहे. हनुमंत शिंदे (वय ३४ रा.संतपेठ पंढरपूर) आणि सुनील चौगुले (वय ३० रा. महावीरनगर पंढरपूर) अशी आरोपींची नावे आहेत. सोमवारी रात्री १० वाजता आश्रुबा जानकीराम गादगे (रा.परभणी) हा हॉटेल कामगार शिवाजी चौकातून पंढरपूर रेल्वेस्टेशन कडे जाण्यासाठी एमएच१३ -सिटी-५०४९ या रिक्षात बसला होता. काही अंतरावर गेल्यानंतर आरोपी सुनील चौगुले हा रिक्षात बसला. रेल्वे स्थानकाजवळ रिक्षा न नेता चालकाने रिक्षा दुसऱ्या गेट जवळ उभी केली. आणि आश्रुबा यांना मारहाण केली. सहाय्यक फौजदार गोसावी तपास करीत आहेत.

## मुस्ती येथे तरुणाची आत्महत्या

**सोलापूर :** एका ३० वर्षीय विवाहित तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मुस्ती (ता. दक्षिण सोलापूर) येथे बुधवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. प्रमोद मोहन शहा (वय ३० रा.मुस्ती ता. दक्षिण सोलापूर) असे मयताचे नाव आहे. आज दुपारी ३ वाजेच्या सुमारास त्याने राहत्या घरातील छताच्या लोखंडी अँगलला दोरीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून शैलेश पाटील (शेजारी) यांनी सोलापूरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. मयत प्रमोद शहा यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई आणि भाऊ असा परिवार आहे. तो किराणा दुकानाचे व्यवसाय करीत होता. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून यामागचे कारण समजले नाही.

# शाळकरी लहानग्यांना फीसाठी ‘जेलचा धडा’

### जन्मदाता कळवळून सांगता होता...

आमची लेकरे काय सराईत आहेत का? तरीपण..बालिकांना पोलिसांनी गाडीत बसविलेच !

ऑन दी स्पॉट रिपोर्ट

- फी न भरल्याने पाठविले पोलीस ठाण्यात; आरोपींप्रमाणे वागणूक
- एचसीसी शाळा आणि पोलिसांनी तोडले अकलेचे कांदे
- घाबरलेल्या मुलांचा हृदय पिळवटणारा आक्रोश

सुराज्य/खास प्रतिनिधी

**शाळेची फी भरली नसल्याचे कारण सांगून मुलींना वर्गाबाहेर काढले...पेपर देण्याला अडथळा केला...पेपर घेण्याची पालकाने विनंती केली...फीसाठी शैक्षणिक नुकसान न करण्याबद्दल विनंती झाली...प्राचार्यांनी विनंती धुडकावून लावली...प्राचार्य अन् पालक यांच्यामध्ये शाब्दिक जुंपली... त्यातून मुली आणि पालकाने मैदानावर ठिया मांडला... प्राचार्यांचा संताप अनावर झाला...प्राचार्यांचा थेट फोन सदर बझार पोलीस ठाण्यात गेला...पुढच्या काही वेळात पोलीस ठाण्याची गाडी आली...आरोपींप्रमाणे शाळकरी मुली अन् पालक यांना पोलीस गाडीत बसवून पोलीस ठाण्यात आणले....शिक्षण घेण्यातून उज्वल भवितव्य घडविण्याचे स्वप्न पाहणाऱ्या बालिकांना आरोपीप्रमाणे वागणूक मिळाली...जणू त्यांना जेलचा धडा मिळाला. दर्जेदार शिक्षण देण्याचे डांगोरे पिटणाऱ्या यंत्रणेचे अक्षरश: धिंडवडे निघाले... हुतात्म्यांची पवित्र नगरी असलेल्या सोलापुरात शिक्षणाची बाजारीकरणाची लक्तरे वेशीवर आली.**

स्थळ : सदर बझार पोलीस ठाणे



### भेदरलेली अन् हताश झालेली ‘ती’ निष्पाप लेकरे...

केवळ फी भरली नाही म्हणून शिक्षक आणि प्राचार्या यांनी सर्व विद्यार्थ्यांसमक्ष अपमानित करणे चालू ठेवले. शिवाय परीक्षेपासून वंचितही ठेवले. परीक्षेपासून वंचित काय ठेवले? हे विचारला गेल्यावर तर कहरच केला. बालिका, बालक यांच्यासह पालक यांची पोलिस ठाण्यात वरात काढली. हे जे सगळे स्कूल शिक्षक तसेच प्राचार्या आणि सदर बझार पोलिस यांनी जे केले त्याने ही लेकरे अक्षरश: मनातून हादरली. फीसाठी जे घडतंय त्यांनं भेदरली. ज्या ठिकाणी आरोपींना बसवितात. त्याच ठिकाणी जेव्हा या निष्पाप लेकरांना ताटकाळत बसविले. तेव्हा ती हबकून गेली होती. हताश झालेल्या त्या लेकरांचा चेहरा केविलवाणा झाला होता.



पोलिसांच्या गाडीतून ठाण्यात नेताना.

### जेलमध्ये पाठविण्याची धमकी

या स्कूलच्या प्राचार्या इस्टर सी विनय यांनी १३ तारखेला आराध्या हिला बोलावून घेऊन ‘तुझे पालक जर शाळेच्या परिसरात दिसले तर आम्ही गुन्हा दाखल करून त्यांना जेलमध्ये पाठव’ असा दम दिला होता, असे रमेश कोळी यांनी सांगितले.

“आमच्या परिवारातील तीन मुली आणि एक मुलगा या शाळेत शिकायला आहेत. या मुला-मुलींची पहिल्या टर्मची फी आम्ही भरली आहे. दुसऱ्या टर्मची फी प्रत्येकी १२ हजार भरायला सांगितली होती. राहिलेली फी भरण्यासाठी आम्ही प्रयत्नशील होतो. अशात मुलगी आणि मुलास पेपरला बसू दिले नाही. परीक्षा गृहातून हाकलून काढले. तर दोन मुलींना २० मिनिटे पेपर उशीरा दिला. फी न भरण्याची एवढी शिक्षा द्यायला नको आहे. आमची लेकरे काय सराईत गुन्हेगार नव्हती, त्यांना पोलिस ठाण्यात नेणे हे मनाला न पटणारे झाले. प्राचार्य यांची भूमिका अत्यंत चुकीची आहे. याप्रकरणी आम्हाला न्याय मिळायला हवा.

**- रमेश कोळी, पालक**

“स्कूलमधील सर्व विद्यार्थ्यांना फी संदर्भात हटकले होते. मात्र, फी भरली नाही म्हणून स्कूलमधील कोणत्याच विद्यार्थ्यांस परीक्षेपासून वंचित ठेवण्यात आले नाही.श्री. कोळी यांची चार मुले स्कूलमध्ये आहेत. त्यांच्या सर्वांचीच परीक्षा घेण्यात आलेली आहे. त्यांचे पेपर आम्ही पुरावे म्हणून दाखवू शकतो.

**- इस्टर सी विनय,**
प्राचार्या, हिंदुस्थानी कॉनव्हेंट स्कूल, सोलापूर

या घटनेच्या पार्श्वभूमीवर, सदर बझार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित लकडे यांना संपर्क साधून त्यांची बाजू ऐकून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, रात्री उशीरापर्यंत त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

### एचसीसी स्कूल अन् पोलिसांचा बेमूवर्तपणा सुन्न करणारा...

केवळ शाळेची फी भरली नाही म्हणून आकांडतांडव तसेच आतातायीपणा करणाऱ्या एचसीसी या स्कूलच्या शिक्षक आणि प्राचार्यांनी सदर बझार पोलिसांनी आज मुली आणि त्यांचा पालक यांच्यासंदर्भात जो ‘प्रताप’ केला. तो मन सुन्न करणारा शिवाय शिक्षण क्षेत्रासह पालक आणि विद्यार्थी यांच्यादृष्टिने अत्यंत गंभीर असल्याच्या प्रतिक्रिया याप्रकरणी जाणकारांनी नोंदविल्या..

सोलापुरातील रेल्वे लाईन परिसरातील हिंदुस्थानी कॉन्टिवेंट इंग्लिश मिडीयम स्कूल म्हणजेच एचसीसी स्कूलमध्ये रमेश कोळी आणि त्यांचे बंधू यांच्या तीन मुली आणि एक मुलगा आहे. पाचवी आणि नववी इयत्तेत हे शिकत आहेत. त्यांची फी भरली नाही. त्यामुळे त्यांना परीक्षा देण्यापासून वंचित ठेवले गेले. शिवाय कोळी परिवाराच्या या मुलांना सातत्याने ‘लक्ष्य’ केले जात होते. विशेषत्वे, पालक कोळी हे शाळा परिसरात दिसले तर त्यांना जेलमध्ये पाठवू अशी धमकी प्राचार्या इस्टर सी विनय यांनी दिली होती. या पार्श्वभूमीवर, आज बुधवारी (ता. १४) रमेश कोळी आणि त्यांचे पाल्य हे निषेध म्हणून शाळेच्या मैदानावर बसले होते. यादरम्यान सदर बझार पोलिसांना एचसीसी स्कूलच्यावतीने फोन करण्यात आला.

पुढच्या काही वेळात पोलीस घटनास्थळी आले. श्री. कोळी आणि बालिकांना गाडी बसवून पोलीस ठाण्यात नेण्यात आले. तिथे तासभर बसविण्यात आले. फी भरली नाही, हा एवढा मोठा गुन्हा नाही, ज्यातून माझ्या लेकरांना पोलीस ठाण्यात नेताय असे श्री. कोळी म्हणत होते. मात्र, या स्कूलची एकतर्फी बाजू घेणाऱ्या पोलिसांनी कोळी यांचे मनावर घेतले नाही. त्यांना पोलीस ठाण्यात आणून आरोपींप्रमाणे बसवून ठेवले. त्यामुळे पालकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.




### आता पुढे काय?

परीक्षापासून वंचित ठेवत शालेय नुकसान करण्यासह थेट पोलिस ठाणे दाखविण्याच्या गंभीर प्रकाराबद्दल पालक श्री कोळी यांनी जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी पालिका शिक्षण मंडळ, सदर बझार पोलिस ठाणे यांच्याकडे तक्रार दिली आहे.खास करुन अप्पर जिल्हाधिकारी यांनी गुरुवारी भेटीसाठी बोलावले आहे. तेव्हा या प्रकरणाचे काय होते? याकडे सर्वांचे लक्ष लागले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



कानामागून आला आणि तिखट झाला !

कल्याण
578-06-150

मुंबई
348-55-140

# रेल्वे स्थानक परिसरातील वाहतूक कोंडीमुळे प्रवासी, वाहनचालक त्रस्त

- रेल्वेस्थानक परिसरातील वाहतूक कोंडीमुळे प्रवासी व वाहनचालक त्रस्त
- बेशिस्त वाहतुकीवर कारवाई करण्याची होतेय मागणी

सुराज्य/सोलापूर प्रतिनिधी

**सोलापूर विभागीय रेल्वे स्थानक असून या स्टेशनच्या अंडर १५ रेल्वे स्थानक येतात. उत्तर भारत आणि दक्षिण भारताला जोडणारे प्रमुख रेल्वे स्थानक आहे.सुमारे ८७ रेल्वे सोलापूर रेल्वे या स्थानकावर ये जा करत असून दररोज २५ ते ३० हजार प्रवासी येथून प्रवास करतात. मात्र रेल्वे स्टेशन समोरील आवारातील बेशिस्त पार्किंग व उलट दिशेने येणाऱ्या बेशिस्त वाहन चालकांमुळे वाहतूक कोंडीमुळे प्रवासी तसेच वाहनचालक त्रस्त झाले आहेत.**

सोलापुरातून सिद्धेश्वर एक्सप्रेस, हुतात्मा एक्सप्रेस, वंदे भारत एक्सप्रेस, इंद्रायणी एक्सप्रेस या रेल्वेने हजारो प्रवासी ये जा असतात.या रेल्वे गाड्या सोलापुरातच रिकाम्या होतात. प्रवाशांना घरी जाण्यासाठी मुख्य प्रवेशद्वारातून रेल्वे स्थानकाच्या बाहेर पडल्यानंतर रिक्षासाठी थेट रस्त्यावर येतात. अन रस्त्यावरील बेशिस्त वाहन पार्किंग व बेशिस्त रिक्षा व इतर वाहनचालकांमुळे स्टेशन परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होते. त्यामुळे रस्ता ओलांडणे सुद्धा





जिकरीचे झाले आहे.त्यामुळे सकाळच्या आणि संध्याकाळच्या सत्रात स्थानिक नागरिकांना व रेल्वे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून शहर वाहतूक विभागाने बॅरिकेड्स लावले आहेत मात्र रेल्वे स्थानक परिसरातील हॉटेल व्यावसायिक आणि दुकानदार यांनी प्रवासी यावे म्हणून बॅरिकेडस मध्ये गॅप ठेवला आहे.त्यामुळे या रिकाम्या जागेतून वाहन चालक उलट दिशेने ये जा करीत आहेत. त्यामुळे या परिसरात रेल्वे आली की मोठयाप्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे.या बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई करून वाहतुकीला शिस्त लावण्याची गरज असल्याचचे मत नागरिकांतून होत आहे.

सोलापूर रेल्वे स्थानकावर ११ तालुके तुळजापूर, उमरगा परिसरातील हजारो प्रवासी प्रवास करीत असतात. या वाहतूक कोंडीमुळे अनेकांच्या रेल्वे चुकलेल्या आम्ही पहिल्या आहेत. सुमारे दिवसभरात ८७ रेल्वे गाड्या ये जा करतात. त्यामुळे साजिकच प्रवाशांची गर्दी असणार आहे.वंदेभारत एक्सप्रेस, सिद्धेश्वर एक्सप्रेस, हुतात्मा एक्सप्रेस, इंद्रायणी एक्सप्रेस सोलापुरात पूर्णपणे रिकाम्या होतात त्यामुळे यातील प्रवासी स्थानकाच्या बाहेर आले की वाहतूक कोंडीत अडकतात. प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो. पोलिस आणि आरटीओचे दुर्लक्ष आहे. दुर्बीण लावून पोलिसांना पाहिले तरी या परिसरातील दिसणार नाही.शहर वाहतूक शाखा फक्त बॅरिकेड्स लावणे आणि काढणे एवढंच काम करते. या वाहतूक कोंडी विषयी त्यांना नवीन काय सुचत नाही अथवा रस्ता सुरक्षा संबंधीच्या तज्ञांना याविषयी बोलावे वाटत नाही.

**- सारंग तारे, सदस्य रस्ता सुरक्षा समिती**

रेल्वे स्थानक परिसरात बेशिस्त वाहतुकीवर दिवसातून दोन ते तीन वेळा कारवाई करावे करण्यात येते. मुलुंड दिशेने वाहतूक होऊ नये म्हणून ब्रॅरीकेडस लावलेले आहेत. ते काढून बेशिस्त वाहन चालक ये जा करत असतात. यापुढे बॅरीकेड्स कोण काढू नये म्हणून कायमचे तारांनी फिक्स करणार आहोत. बेशिस्त वाहन चालक आणि रिक्षा चालकांवर उद्या पासून कारवाईसाठी मोहीम राबविणार आहे.

**- तानाजी दराडे, पोलिस निरीक्षक, शहर वाहतूक दक्षिण विभाग**